# महाविद्यालय विकास समिती सहविचार सभा

दिनांक- 18 /7/ 24 रोजी सकाळी 11:30 वाजता महाविद्यालय विकास समितीची सहविचार सभा मा. सचिव प्राचार्य डॉ. रमा भोसले यांच्या उपस्थितीत सेमिनार कक्षात आयोजित करण्यात आली. या सभेला मा. अध्यक्ष डॉ. विजय नारखेडे सर बाहेरगावी असल्यामुळे अनुपस्थितीत होते. पण त्यांनी सदर सभा वेळेवर आयोजित करणे विषयी अनुमती दिलेली आहे असे मा. प्राचार्यांनी सूचित केले.

डॉ.उज्वला डोमे यांनी मा. प्राचार्य व सर्व सदस्यांचे स्वागत केले. या सभेसाठी नवनियुक्त सदस्य प्राध्यापक ॲडव्होकेट संदीप वाघ सर यांचे विशेष स्वागत करण्यात आले. अतिवृष्टीमुळे काही सदस्य गुगल मीट लिंक द्वारे ऑनलाईन उपस्थितीत होते. सभेमध्ये खालील विषयावर चर्चा झाली

1) सभेच्या सुरुवातीला मागील सभेचा वृत्तांत वाचून कायम करण्यात आला. या वृत्तांतानुसार पीएलए बजेट अद्यापही संचालनालयाकडे सादर केलेले नाही. पूर्वीच्या पीएलए मध्ये चुका आहेत. त्यामुळे नवीन बजेट सादर करता आले नाही असे मा. प्राचार्यांनी सूचित केले.

**2) वार्षिक नियोजनास मंजुरी घेणे --** वार्षिक नियोजनाबाबत मा. प्राचार्यांनी सविस्तर चर्चा केली. डॉ. प्रियंका सुभेदार यांनी शैक्षणिक वर्ष 24 -25 साठीचे वार्षिक नियोजन तयार केले. त्यास मंजुरी घेण्यात आली. AQAR साठी असून त्याचे उपयोजन करण्यास सुरुवात केली आहे. वार्षिक नियोजनास मंजुरी घेणे आवश्यक असल्याचे मत मा. प्राचार्यांनी व्यक्त केले.

**3) बांधकाम विभागाचे अंदाजपत्रक मिळवण्यासाठी पाठपुरावा करणे --** कॉलेज उन्नयणीकरणाच्या(uplifting) च्या शासनाच्या योजनेनुसार समिती तयार केली आहे. त्याबाबतचा प्रस्ताव बांधकाम विद्युतीकरण व फर्निचर अशा तीन भागांमध्ये करून पीडब्ल्यूडीला सादर केलेला आहे. परंतु पीडब्ल्यूडी करून अंदाजपत्रक न आल्यामुळे सदर कामकाज स्थगित असल्याचे मा. प्राचार्यांनी सूचित केले.

**4) कार्यालयीन कर्मचाऱ्यांच्या बेशिस्त वर्तनासाठी वरिष्ठ कार्यालयाला अवगत करणे** -- कार्यालयीन कर्मचारी हे अभ्यागतांबरोबर बेशिस्त वर्तन करतात. त्यांना आवश्यक ती माहिती तसेच सहकार्य करत नसल्याचे मा. प्राचार्यांनी सुचित केले .शासनाकडे नवीन मनुष्यबळाची वारंवार मागणी केली आहे. पण मनुष्यबळ उपलब्ध होत नसल्यामुळे कामकाजात अडथळे येतात.

**6 मुलींच्या वसतिगृह नूतनीकरणासाठी डीपीडीसीकडे प्रस्ताव सादर करणे.**-- मुलींचे वस्तीगृहाची पडझड झालेली असून सध्या नूतनीकरणाचे काम डीपीडीसी मार्फत अर्धवट आहे. त्यासंदर्भात डीपीडीसी मार्फत नूतनीकरण करणे आवश्यक आहे असे मत मा. प्राचार्यांनी सूचित केले.

Scanned with OKEN Scanner

**7) नवीन Curriculum lab ची निर्मिती -**

एनसीटीच्या निकषानुसार curriculum लॅब हा अविभाज्य भाग आहे. महाविद्यालय व विद्यापीठ अभ्यासक्रमा नुसार ही लॅब निर्माण करावी असे मत मा. प्राचार्यांनी व्यक्त केले. सदर लॅब ही मानसशास्त्र विभागामध्ये तयार करण्याचा मानस असल्याचे मा. प्राचार्यांनी सूचित केले. बीएड कॉलेजचा हा अनिवार्य भाग असल्यामुळे curriculum लॅब निर्माण करण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे. पुढील मीटिंगमध्ये याबाबत आढावा घेतला जाईल असे मत मा. प्राचार्यांनी व्यक्त केले. Curriculum lab ही संकल्पना बीएड कॉलेज साठी वेगळी आहे. Curriculum, syllabus, textbook अशी लिंक आहे. याबाबत बी.एड विद्यार्थ्यांमध्ये अध्यापन पद्धतीच्या(Pedagogy) माध्यमातून उद्बोधन होणे आवश्यक असल्याचे मत मा.प्राचार्याने सुचित केले. सदर संकल्पना खूप उपयोगी आहे. असे मत सदस्य ॲडव्होकेट संदीप वाघ यांनी व्यक्त केले.यामुळे विद्यार्थ्यांना स्टेट बोर्ड, सीबीएससी, ISSE ची पुस्तके हाताळण्याची संधी मिळते.

**8) सामूहिक अनुपस्थिती बाबत** --- सध्या महाविद्यालयात पाच प्राध्यापक कार्यरत असून एकावेळी अनेक प्राध्यापकांनी रजा घेऊ नये असे मत मा.प्राचार्यांनी सुचित केले. एकावेळी अनेक प्राध्यापक अनुपस्थित असल्यामुळे प्रात्यक्षिक अंमलबजावणीमध्ये अडथळे येतात. कमी मनुष्यबळ असल्यामुळे एकावेळी एका प्राध्यापकाने रजा घ्यावी. असा नियम करता येईल तसेच रजा ही सुविधा आहे हक्क नाही. असे मा. प्राचार्यांनी सुचित केले. प्रशासकीय गुणवत्तेबाबत विद्यार्थ्यांसाठी मा. वैशंपायन मॅडमचे व्याख्यान ठेवण्याविषयी मा. प्राचार्यांनी चर्चा केली.

**9) ऐन वेळेचे विषय**

जयंती पुण्यतिथी चे कार्यक्रम अगर सांस्कृतिक कार्यक्रम फार विलंब असणारे किंवा फार छोटे होऊ नयेत याविषयी सदस्यांमध्ये चर्चा झाली .याबाबत स्वतंत्र मीटिंग घेऊन ठरवावे असे मत प्राध्यापक डॉ. बी. जी. खाडे यांनी व्यक्त केले. तसेच विद्यार्थी प्रतिनिधी अविनाश काटवटेयांनी कार्यक्रमांमध्ये एकसारखे पणा न आणता नवीन वेगळ्या स्वरूपात कार्यक्रम घ्यावा व कार्यक्रम हा एक तासाचा असावा असे मत व्यक्त केले.

सभेच्या शेवटी प्राध्यापक डॉ .प्रियंका सुभेदार यांनी सहविचार सभेच्या सचिव मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले यांच्या मार्गदर्शनाबद्दल आभार व्यक्त केले. तसेच संदीप वाघ, एन.डी खान या उपस्थित सदस्यांनी चर्चेत सहभागी होऊन योगदान दिल्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त केले ऑनलाइन मीटिंगसाठी उपस्थित डॉ. गणेश ठाकूर ,वैशंपायन मॅडम यांचेही आभार व्यक्त केले. तसेच उपस्थित सर्व प्राध्यापक व विद्यार्थी प्रतिनिधी अविनाश काटवटे या सर्वांचे आभार व्यक्त करून मा .प्राचार्यांच्या अनुमतीने सदर सभा संपन्न झाल्याचे जाहीर केले.

RBhoslay

Principal
Government College of Education (CTE)
Panvel, Dist. Raigad - 410206

Scanned with OKEN Scanner